जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
काटा रोड वाशिम - ४४४५०५
दूरध्वनी ०७२५२-२३४२३८ फॅक्स ०७२५२-२३२८५८
ईमेल : rdc_washim@rediffmail.com वेबसाईट http://www.washim.nic.in

क्र.कक्ष-३/अका/रालोनों/कावि-७७४/२०१६ दिनांक :-१८/८/२०१६

**जाहीर ई-निवीदा सुचना सन २०१६**

राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अद्ययावत करण्यासाठी NPR पुस्तकामधील माहिती सॉपफटवेअर मध्ये डाटा एंन्ट्री करणेबाबत.

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम या कार्यालयाकडुन राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अद्ययावत करण्यासाठी NPR पुस्तकामधील माहिती नुसार पोर्टलवरील लोकसंख्या ११७८७६४ एवढी असुन राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अद्ययावत करण्यासाठी NPR पुस्तकामधील माहिती सॉफ्टवेअर मध्ये भरणे / डाटा ऐन्ट्री करणेचे कामाबाबत नोंदनिकृत ठेकेदाराकडुन माहोरबंद निवीदा मागवीण्यात येत आहेत. तसेच निवीदेच्या अटी व शर्ती वाशिम जिल्हयाच्या http://www.washim.nic.in व http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

१. निवीदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण http://www.washim.nic.in व http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर सदर निवीदेची माहिती उपलब्ध आहे. सदर विहीत नमुन्यामध्येच पुरवठादारांनी आपल्या निवीदा ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.

२. निवीदा फॉर्म भरण्याची पध्दत व फी - सदर निवीदा http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. त्याकरीता सदर संकेतस्थळावरील विहीत कार्यपध्दतीनुसार ऑनलाईन प्रणालीव्दारे रु.३,०००/- निवीदा फॉर्म फी व ५०,०००/- बयाना रक्कम भरावे. तसेच भरलेली पावती अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांचेकडे दि.३१/८/२०१६ संध्या.६.०० पर्यंत जमा करुन निवीदा प्रक्रीयेमध्ये पुरवठा दारांना सहभागी होता येईल. त्यानंतर दाखल केलेल्या निवीदा रदद समजल्या जातील.

३. ई-निवीदा ही http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे सादर करावी लागेल.

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निवीदा प्रकाशित करणे | २२/८/२०१६ | ११ वाजता |
| २ | ई-निवीदा डाउनलोड | २२/८/२०१६ते ३१/८/२०१६ | ११ वाजता |
| ३ | ई-निवीदा सादर करणे | ३१/८/२०१६ | संध्याकाळी ६ पर्यंत |
| ४ | ई-निवीदेतील तांत्रीक लिफाफा उघडण्याचा दिनांक | २/९/२०१६ | सकाळी ११.०० वाजता |
| ५ | ई- निवीदेतील दराबाबतचा लिफाफा उघडण्याचा दिनांक | तांत्रीक लिफाफा मध्ये सर्व अटि पुर्ण केल्यानंतर | |

स्वा/-
जिल्हाधिकारी वाशिम

१. अ) तांत्रिक लिफाफा क्रं.१

तांत्रिक निवेदेच्या लिफाफ्यामध्ये पुढील नमुद केलेल्या बाबी सादर कराव्यात निवीदा धारक फर्म / संस्थेचे नाव

अ.निवीदाधारकांनी ऑनलाईन भरलेल्या सर्व अटी व शर्तीचे कागदपत्र कार्यालयीन वेळेत दि.३१/८/२०१६ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम (जनगणना शाखा) यांचेकडे जमा करावे.

१.निवीदा धारकाचे पुर्ण नाव

२.पत्ता,दुरध्वनी क्रमांक व इमेल आयडी

३.निवीदाधारक संस्था प्रोप्रायटरशीप,पार्टनरशीप,प्रायवेट लिमीटेड,फर्म,सहकारी संस्था इत्यादी ज्या प्रकरणाची नोंदणी असेल त्याची नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक (छायांकीत प्रत जोडावी)

४.पॅन व टॅन नंबर (छायांकीत प्रत जोडावी)

५.आयकर विवरणपत्र अदयावत (छायांकीत प्रत जोडावी) मागील तिन वर्षाचे

६.सेवा कर (Service Tax Registration) (छायांकीत प्रत जोडावी)

७.प्रति वर्ष २० लाखाची उलाढाल असलेली सनदी लेखापाल (CA) यांचे बॅलन्स सिट

८.निवीदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१०० च्या स्टॅम्पवर नोटरी / कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र

९.शासकीय निमशासकीय कार्यालयाकडुन संस्था काळ्या यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

१०.सध्या सुरु असलेल्या व यापुर्वी केलेल्या कामाबाबतची माहिती (अनुभव प्रमाणपत्र २ वर्षाचे)

११.शासकीय / निमशासकीय कार्यालयाचा पुर्वानुभव दाखला.

१२.उपलब्ध Data Entry Operator बाबत सविस्तर माहिती (संस्था /तालुकानिहाय Data Entry Operator ची माहितीची यादी.)

१३.सदर निवीदेकरीता निवीदा धारकाचे Upload केलेली कागदपत्र खरी असल्याबाबतचे स्वघोषणापत्र.

१४.सुरक्षा रक्कम ५०,०००/-ऑनलाईन रिसीप्ट

१५.किती संगणक संचाची उपलब्धता करणार आहेत त्याची संख्या.

१६.सर्व Data Entry Operators १२ वी पास असल्याचे व त्यांना इंग्रजी मराठीचे ज्ञान असल्याचे घोषणापत्र.

२.ब) दरांचा लिफाफा

१.निवीदेचे दर विहीत केलेल्या फॉर्म नं.२ मध्येच भरावे

२.निवीदेच्या फॉर्म नं.२ मध्ये दिलेल्या प्रत्येक बाबींचे दर नमुद करावेत दर अंकी व अक्षरी नमुद करावेत.

## अटी व शर्ती

राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावत करण्यासाठी (NPR) पुस्तकामधिल माहिती संगणक कार्यप्रणाली (Data Entry Software) मध्ये नोंदीसाठी निवीदा मागवीण्यात येत आहे.निवीदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१.NPR पुस्तीका तहसिलदार व नगरपालीका स्तरावर उपलब्ध आहेत कंत्राटदाराने स्वत:च्या जबाबदारीवर सबंधिताकडुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

२.संगणक कार्यप्रणालीमध्ये नोंदवीण्याचे काम ६० दिवस (सुटीचे दिवस धरुन) ६०दिवसात पुर्ण करावयाचे आहे.

३.NPR पुस्तीकामधील प्रत्यक्ष माहिती संगणकीय कार्यप्रणाली (Software) मध्ये नोंदणी करणे व ती वैधतीकरण (Verification) करणे.

४.पर्यवेक्षकामार्फत गुणवत्ता तपासणी करण्यात येईल.

५.आवश्यक त्या ठिकाणी नोंदणीची दुरुस्ती करणे व NPR माहिती पुस्तीका मधिल माहिती भरणे व शुध्द करणे (दोषरहीत करणे)

६.माहिती नोंदणीकार (Data Entry Operator) हा कमीत कमी १२ वी उत्तीर्ण असावा.

७.माहिती नोंदकार संगणक साक्षर असावा त्याला इंग्रजी व मराठी भाषेमध्ये माहिती नोंदवीण्याचा अनुभव असावा.

८.NIC दिल्ली यांच्यामार्फत माहिती  नोंदवीण्याची संगणक कार्यप्रणाली (Data Entry Software) विकसीत करण्यात आलेली आहे.त्यामध्ये Data Entry Online करावी लागेल.

९. NPR पुस्तीका प्रमाणे रेशनकार्ड क्रमांक,आधार कार्ड क्रमांक,मोबाईल क्रमांक यासह इतर वैयक्तीक माहिती भरणे व दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

१०.या कामी पर्यवेक्षक म्हणुन प्रशासकीय अधिका-यांची नियुक्ती करण्यात येईल.

११.पर्यवेक्षण २० टक्के माहितीची तपासणी करेल व त्याबाबतचे प्रमाणपत्र देईल.

१२.पर्यवेक्षकाने गुणवत्ता तपासल्यानंतर  NPR Data Base मध्ये आवश्यक त्या दुरुस्ती झाल्याचे कंत्राटदाराकडुन सुधारीत Data Base NIC च्या Surver वर कंत्राटदारने Upload करणे आवश्यक आहे.

१३.माहिती नोंदणीच्या कामाचे प्रगतीचे निरीक्षण Online portel व्दारे सर्व स्तरावरील अधिका-यामार्फत करण्यात येईल.

१४.माहिती नोंदणीकाराने  (Data Entry Operator) प्रतिदीन माहिती सरासरी २०० रेकॉर्डस नोंदणी करणे अपेक्षीत आहे.

१५.माहिती नोंदणीकारावर देखरेख ठेवण्यासाठी कंत्राटदाराने पर्यवेक्षक ठेवणे देखील अपेक्षीत आहे.

१६.माहिती नोंदणीची संगणक कार्यप्रणालीचे प्रशिक्षण जनगणना कार्यालयामार्फत देण्यात येईल.

१७.कंत्राटदाराने त्यांचेकडील उपलब्ध असलेल्या संगणक संचाची संख्या दयावी व किती संगणक उपलब्ध करुन देउ शकेल याची वेगळी माहिती दयावी.जेणेकरुन त्याची क्षमता ठरविता येईल.

१८.सदरहु संगणक संच अदयावत कार्यप्रणाली(Software) चे असावे.वे ते (Current) चालु इतर सर्व प्रकारचे Software सोबत जुळणारे (Match) असावे.

१९.प्रत्येक संगणकामध्ये Recent Anti Virus टाकलेले असावे व ते Uploadede ठेवावे.

२०.संगणकाची Speed ही अदयावत Ram ची असावी व ती वाढवीण्याची,सुव्यवस्थीत ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२१.Data Entry करताना कोणताही डाटा उडाला किंवा नष्ट (Delete)झाला तर पुनश्च करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२२.कंत्राटदाराला माहिती नोंदणी करणेसाठी स्वत:चे Internet Connection वापरावे लागेल त्याबाबतची तांत्रीक उपलब्धता कंत्राटदाराने सादर करावी.

२३.माहिती नोंदणीकृत (Data Entry Operator) साठी लागणारे सर्व प्रकारचे फर्निचर व इतर सुवीधा हया कंत्राटदाराने स्वत: उपलब्ध करुन दयावयाच्या आहेत.

२४.संगणक प्रणालीमध्ये एका व्यक्तीची वैयक्तीक माहितीची दुरुस्ती करणे,माहिती नोंदणी करणे व निरीक्षणासाठी रेकॉर्ड प्रमाणे प्रती व्यक्ती दर दयावा. (संगणक कार्यप्रणालीमध्ये माहितीची दुरुस्ती करणे,माहितीची नोंदणी आणि निरीक्षणासाठी प्रति रेकॉर्ड एका व्यक्तीची वैयक्तीक सर्व माहिती रु.३.८० पैसे अक्षरी तिन रुपये अंशी पैशे इतक्या रक्कमेस मान्यता दिलेली आहे.) त्यामुळे रु.३.८० पेक्षा कमी निवीदा दर असावेत.

२५.सदरहु काम तहसिलदार स्तर ,नगरपालीका स्तर  किंवा एकत्रितपणे करण्यात येवु शकेल याबाबत जिल्हाधिकारी हे आदेश देतील त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

२६.कंत्राटदार हा नोंदणीकृत असावा त्याचे आयकरचे विवरणपत्र,सर्व्हीस टॅक्स बाबतचे विवरणपत्र व सेल टॅक्सचे विवरणपत्र अदयावत असावे व ते निवीदेसोबत सादर करावे.

२७.निवीदेसोबत PAN NO व TIN NO दोन्हीचे अदयावत प्रमाणपत्र सादर करावे.

२८.निवीदाकाराने कामाचे २ वर्षाचे तरी अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडावे.

२९.निविदा  फॉर्मची किमंत ३,०००-/- रु ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावे.

३०.निविदे सोबत अनामत रक्कम ५०,०००-/- रु. भरावे.

३२.वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या इतर सुचनांचे पालन करावे लागेल.

३३.चुकीच्या कामासाठी किंवा कामातील दिरंगाई व इतर त्रृटी बददल दंड आकारण्यात येईल.

३४.दरपत्रक परिशिष्ट किंवा त्यास संलग्न प्रपत्र यामध्ये कोणत्याही प्रकारचे कमी जास्त बदल किंवा खोडाखोड असल्यास ई निवीदा स्वीकारली जाणार नाही.

३५.सदर ई निवीदेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकारी जिल्हाधिकारी यांना राहील.

३६.कोणतीही ई निवीदा पुर्णपणे किंवा त्या निवीदेचा काही भाग स्वीकारणे अगर नामंजुर करणे याबात अधिकारी जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

३७.जर दोन किंवा अधिक ठेकेदारांनी निवीदेमध्ये दिलेले दर सारखेच असतील तर प्राप्त निवीदेपैकी कोणतीही ई निवीदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

३८.पुरवठा धारकास अदा करण्यात येणा-या देयकातुन नियमानुसार आयकर व त्यावरील सरचार्ज वॅट सेलटॅक्स इत्यादी कराबाबत शासनाचे धोरणानुसार कपात करण्यात येईल.

३९.निवीदा उघडण्याची प्रक्रीया सुरु असतेवेळी एखादया निवीदा धारकाने दाखल केलेली ई निवीदा काही कारणास्तव उघडण्यात येवु नये अशी विनंती लेखी अर्ज सादर केल्यास संबंधित निवीदाधारकाने निवीदेसोबत जमा केलेले बयाना रक्कमेचे डीपॉझिट जप्त करण्यात येईल तसेच सदर निवीदा अस्वीकृत करुन कार्यालयात जमा करण्यात येईल.

४०.वरील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा तसेच काही नवीन अटी व शर्ती समाविष्ट अथवा शिथील करण्याचा तसेच कोणतेही कारण न देता एकतर्फी निवीदा मंजुर करण्याचा व करारनामा संपुष्टात आणण्याचा अधिकारी जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे राखुन ठेवण्यात आला आहे तो निवीदाधारकास बंधनकारक असेल काही वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

४१. ई निवीदा ही व्दी लिफाफा पध्दतीने असल्यामुळे एक तांत्रिक लिफाफा व दुसरा दरपत्रक लिफाफा असे एकत्रित दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाप्यामध्ये सिलबंद करुन सादर करणे आवश्यक राहील व सदर लिफाप्यावर लिफाफा अ व ब लिाफाफा लिहुन सादर करणे बंधनकारक राहील.

४२.सदर निवीदेबाबत निवीदाधारक मा. न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा ही वाशिम जिल्हा असेल .

४३. दिलेल्या लोकसंख्ये व्यतिरिक्त वजा अधिक झालेली ऑनलाईन पोर्टलवरील अदयावत असलेली माहिती बाबत नोंद करणे अनिर्वाय राहील.

४४. सर्व तहसिल व नगर पालिका स्तरावर डाटा ऐन्ट्रीचे काम एकाचवेळी सुरु करणे आवश्यक राहील.

४५. जिल्हा स्तरावर नेमण्यात आलेल्या एजन्सीवर माहिती नोंदणीचे काम विहीत कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक संख्येमध्ये माहिती नोंदकार पुरविण्याची जवाबदारी राहील.

४६. निवीदाधारकाने करारनाम्यातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास त्याची पुर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४७.निवीदेचे दर यासोबत दिलेल्या प्रपत्रातच भरुन दयावे लागतील.

४८. पुरवठा धारकास भारतीय दंड संहीतेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास अथवा काळ्या यादीत घोषित केले असल्यास किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असल्यास अशा कंत्राटदारांनी स्वत;किंवा त्यांचे नातेवाइकांच्या नावाने निवीदा भरु नये.अशा निवीदा देण्यात आलेले कंत्राट रदद करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

४९. वरील अटी व शर्ती मान्य असल्यास इच्छुक कंत्राटदारांनी ई निवीदा सादर करावी.

दिनांक- १८/८/२०१६

ठिकाण- वाशिम

स्वा/-

जिल्हाधिकारी वाशिम

# निवीदा फॉर्म क्रमांक- १

(तांत्रिक लिफाफा)

जिल्हाधिकारी कार्यालय (स्थानिक निधी विभाग) वाशिम जिल्हयातील राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावत करण्यासठी (NPR) पुस्तकाधील माहिती सॉप्टेवेअर मध्ये डाटा एन्ट्री करणबाबत ई-निविदामध्ये दिलेल्या सुचनानुसार खालील प्रमाणे दर पत्रक व इतर बाबीची माहिती देत आहे.

| अ.क्र | तपशिल | माहिती सोबत जोडली /नाही |
|---|---|---|
| १ | निवीदा धारक फर्म /संस्थाचे नाव | |
| २ | निवीदा धारकांचे पूर्ण नाव | |
| ३ | पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ईमेल आयडी | |
| ४ | निवीदाधारक संस्था, प्रोप्रायटरशिप,पार्टनरीशिप,प्रायवेट लिमीटेड फर्म सहकारी संस्था इत्यादी ज्या प्रकरणाची नोंदणी असेल त्यांची नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक(छायांकीत प्रत जोडावी) | |
| ५ | पॅन व टिन नंबर (छायांकीत प्रत जोडावी ) | |
| ६ | आयकर विवरणपत्र अदयावत (छायांकीत प्रत जोडावी ) मागील ३ वर्षाचे (Return) | |
| ७ | प्रति वर्ष २० लाखाची उलाढाल असलेली सनदी लेखापाल (CA) यांचे बॅलन्स सिट | |
| ८ | सेवा कर (service Tax Registraton) (छायांकीत प्रत जोडावी ) | |
| ९ | निवीदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१०० च्या स्टॅम्पवर नोटरी/कार्यकारी दंधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र | |
| १० | शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन संस्था काळ्या यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| ११ | संध्या सुरु असलेल्या व यापुर्वी केलेल्या कामाबाबतची माहिती (अनुभव प्रमाणपत्र २ वर्षाचे) | |
| १२ | शासकीय /निमशासकीय कार्यालयाचा पुर्वानुभव दाखला | |
| १३ | अपलब्ध Data Entry Operator बाबत सविस्तर माहिती (संख्या/ तालुकानिहाय Data Entry Operator माहितीची यादी) | |
| १४ | सदर निवीदेकरीता निवीदाधारकाचे Upload केलेली कागदपत्र खरी असल्याबाबतचे स्वघोषणापत्र | |
| १५ | सुरक्षा रक्कम ५०,०००/- ऑनलाईन रिसीप्ट | |
| १६ | किती संगणक संचाची उपलब्धता करणार आहेत त्याची संख्या. | |
| १७ | सर्व Data Entry, Operators १२ वी पास असल्याचे व त्यांना इंग्रजी मराठीचे ज्ञान असल्याचे घोषणापत्र. | |

दिनांक :- निवीदा धारकाचा सही ----------

ठिकाण :- निवीदा धारकाचे नाव -----------

फर्म चे नाव व पत्ता -------------

**निवीदा फॉर्म क्रमांक- २**

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम (स्थानिक निधी विभाग) NPR Data Entry करण्यासाठी सिलबंद  निवीदेमध्ये दिलेल्या सुचनेनुसार खालील प्रमाणे दरपत्रकाची माहिती देत आहे.

१. निवीदा  धारकाचे /फर्मचे नाव व पत्ता -----------------------------------------------------

| अ.क्र. | तपशिल | प्रति व्यक्ती डाटा ऐंन्ट्री दर रुपये व पैसे |
|---|---|---|
| १ | NPR पुस्तकातील माहिती (प्रत्येक व्यक्तीचे) नागरीकांचे, राशन कार्ड क्रमांक, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, Email ID व इतर माहिती Data Entry Software मध्ये Upload करणे व (Validation) वैधतीकरण करणे, | |

टिप :- निवीदेतील अटि व शर्ती मी वाचल्या असुन त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन मला बंधनकारक आहे. करिता खाली स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक :- निवीदा धारकाचा सही ----------

ठिकाण :- निवीदा धारकाचे नाव -----------

फर्म चे नाव व पत्ता -------------

प्रति,

जिल्हाधिकारी वाशिम

मी याव्दारे जिल्हाधिकारी वाशिम (स्थानिक निधी विभाग) या कार्यालयास NPR Software मध्ये माहिती भरण्यासाठी /Data Entry करणेसाठी वाशिम जिल्हयातील सर्व तालुक्यातील प्राप्त झालेल्या सर्व व्यक्तींची माहिती Online भरणे / Data Entry करणेसाठी मराठी,इंग्रजी भाषेचा टंकलेखनाचा अनुभव असलेला डाटा एंन्ट्री ऑपरेटर प्रत्येक तालुका / जिल्हा निहाय पुरवीणे कामी व डाटा अपलोड करणे कामी सोबत जोडल्याप्रमाणे व्यापारी व तांत्रीक लिफाफयात माझी निवीदा सादर करीत आहे.

निवीदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्यास मी बांधील आहे.

**<u>प्रतिज्ञापत्र</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञा करतो की, मी सादर केलेली निवीदा मंजुर झाल्यास निवीदेतील कामकाज मी उच्च गुणवत्तेने व दिलेल्या मुदतीत पार पाडेन व या कामासाठी आवश्यक मनुष्यबळ,उपलब्ध करुन देईन.तसेच मी निवीदेव्दारे जे शासकीय काम देणेत येईल व सबंधीत कागदपत्रे देण्यात येतील त्याबाबत पुर्णत: गुप्ततेची हमी घेत आहे. डाटा ऐंन्ट्री ऑपरेटरची संख्या व कालावधी हा जिल्हाधिकारी वाशिम यांचे सुचनेनुसार राहील.माझी अभिकर्ता म्हणुन निवीदा मंजुर असली तरीही डाटा ऐंन्ट्री Npr Software मध्ये सॉफटवेअरचे काम दिलेल्या वेळेत पुर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.मा.जिल्हाधिकारी (स्थानिक निधी विभाग) वाशिम यांचे लेखी सुचनेनुसार काम करणे बंधनकारक राहील तसेच स्वीकृत केलेल्या निवीदेचा अंतीम दर हा मा.जिल्हाधिकारी वाशिम यांच्या मान्यतेस अधिन राहुन व त्यांनी मंजुर केलेला दर मला मान्य राहील.

मला हयाबाबत पुर्ण कल्पना आहे की, माझ्या कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर / दिरंगाई झाल्यास जिल्हाधिकारी निश्चित करतील अशा दंडास मी पात्र राहीन.

निवीदा धारकाची स्वाक्षरी

१.निवीदा ज्यांकडुन दाखल करण्यात आल्या त्या संस्था / उदयोगाचे नाव - व पत्ता-

२.निवीदा धारकाचे संपुर्ण नाव व पत्ता-
मोबाईल क्रमांक-

साक्षीदार-

१.------------------------------------ रा.--------------------- (स्वाक्षरी)--------------------

२.------------------------------------ रा.--------------------- (स्वाक्षरी)--------------------

# स्वघोषणापत्र

मी ---------------------------------------- रा.------------------------------ वय------------ सत्यप्रतिज्ञेवर लिहुन देतो की,जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम (स्थानिक निधी शाखा) या कार्यालयाची राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अदयावत करण्यासाठी (NPR) सॉप्टवेअर मध्ये डाटा एन्ट्री करण्यासाठी संगणक संच, डाटा ऐन्ट्री ऑपरेटर्ससह ऑनलाईन सॉप्टवेअरमध्ये नोंदणी करण्यासाठी ई- निवीदा सुचना सन २०१६ करिता-------------------------------------------------- या फर्मने निवीदा सादर केलेली असुन सदर निवीदेकरीता मी www.mahatenders.gov.in या ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड केलेले तसेच कार्यालयास सिलबंद पाकीटामध्ये निवीदेसोबत सादर केलेले सर्व कागदपत्रे / माहिती खरी असुन सदर कागदपत्रे व माहिती खोटी आढल्यास भा.द.वि.कलम १९९,२०० अन्वये मी शिक्षेस पात्र राहील.

ठिकाण:- वाशिम

दिनांक:- / /२०१६

स्वघोषणापत्र करणाराची सही व नाव

साक्षीदाराची सही ---------------------------------------------

नाव ----------------------------------------------------------

पत्ता ----------------------------------------------------------